महाराष्ट्र शासन

क्रमांक : गौखनि ३७/०७१९/प्र.क्र.११२/ख-१

महसूल व वन विभाग
मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ३२
दिनांक : १८ सप्टेंबर, २०१९.

विषय : गौण खनिज-सोलापूर
सन २०१८-१९ या वर्षाकरिता मौजे औज (म), ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर या वाळूगटाची शासनजमा केलेली रक्कम परत करणेबाबत.
- प्रतिक इन्फ्रास्ट्रक्चर प्रो. प्रा. नागेश लक्ष्मण ताकमोगे.

शासन ज्ञापन:

जिल्हाधिकारी, सोलापूर यांना त्यांचे पत्र क्रमांक क्र.मशा/कार्या-१/गौख/आरआर-१८००/२०१९, दि.९/०७/२०१९ रोजीच्या उपरोक्त विषयाबाबतच्या पत्रास अनुलक्षून असे कळविण्याचे मला निदेश आहेत की, सन २०१८-१९ करीता मौजे औज (म), ता. दक्षिण सोलापूर या वाळूगटातील ४१,४९३ ब्रास वाळूकरीता प्रतिक इन्फ्रास्ट्रक्चर प्रो. प्रा. नागेश लक्ष्मण ताकमोगे यांना रू.१२,०८,००,०००/- इतक्या सर्वोच्च रकमेस दि.२२/०४/२०१९ रोजीच्या आदेशान्वये मंजूर करण्यात आला. सदर वाळूगटाचा ताबा मंडल अधिकारी, निंबर्गी, ता. दक्षिण सोलापूर यांनी दि.२६/०४/२०१९ रोजी लिलावधारकास दिला.

२. मा. मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर येथे दाखल जनहित याचिका क्र.११०/२०१८ मध्ये मा. उच्च न्यायालयाने दि.७/१२/२०१८ रोजीच्या आदेशाचे उल्लंघन होत असल्याचे नमूद करून दि.२९/०४/२०१९ रोजीच्या आदेशान्वये सन २०१८-१९ या वर्षात पार पाडलेल्या लिलावप्रक्रिया व त्यानुसार केलेल्या कार्यवाहीबाबत शंका उपस्थित केली. त्याअनुषंगाने शासनाकडे मार्गदर्शन मागवून सदर मार्गदर्शन प्राप्त होईपर्यंत सदर वाळूगट बंद करण्यात आला. जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी मार्गदर्शन मागितल्यानुसार शासनाने दि.०७/०६/२०१९ रोजीच्या पत्रान्वये सन २०१८-१९ या वर्षाकरीता ३० सप्टेंबर, २०१९ पर्यंतच्या कालावधीसाठी लिलावप्रक्रिया राबविण्यास वाळू/रेती उत्खनन व वाहतूक करण्यास मा. उच्च न्यायालयाची स्थगिती नाही, असे मा. उच्च न्यायालयाच्या दि.६/०६/२०१९ च्या आदेशान्वये स्पष्ट करण्यात आले असल्याचे कळविले. त्यानुसार दि.१०/०६/२०१९ रोजीच्या पत्रान्वये रिट याचिका (स्टँप) क्र.१४८०८-१४८१०/२०१९ मध्ये पुढील होणाऱ्या निर्णयास अधीन राहुन तसेच पुढील आदेशापर्यंत वाळू उत्खनन व वाहतुक करणेबाबतचे आदेश देण्यात आले.

३. दरम्यान लिलावधारक प्रतिक इन्फ्रास्ट्रक्चर प्रो. प्रा. नागेश ताकमोगे यांनी दि.१३/०६/२०१९ रोजीच्या पत्रान्वये, वाळूगटातून उत्खनन करणेस विरोध करणाऱ्या ग्रामस्थांवर कारवाई करण्याची व बंद असलेले उत्खनन चालू करून देणेबाबत विनंती केल्यानुसार, तहसिलदार, दक्षिण सोलापूर यांना अहवाल सादर करणेबाबत कळविण्यात आले. त्यानुसार तहसिलदार, दक्षिण सोलापूर यांनी स्थळपाहणी करून दि.२६/०६/२०१९ रोजीच्या अहवालान्वये दुष्काळी परिस्थिती, पाणी व चारा टंचाई यामुळे होणाऱ्या विरोधामुळे उत्खनन व वाहतूक पुर्णपणे बंद आहे. तसेच ग्रामस्थांचा विरोध झुगारून उत्खनन चालू केल्यास कायदा व सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्न निर्माण होईल. त्याचबरोबर मान्सून लांबल्यामुळे सध्याच्या दुष्काळी परिस्थितीत लिलावधारकास वाळू उत्खननास स्थगिती

देण्यात यावी असे मत नोंदविलेले आहे. ग्रामपंचायतीने वाळूगटातून वाळूचे उत्खनन बंद करणेबाबतचा दि.३०/०५/२०१९ रोजी ठराव घेवून वाळूगट बंद करणेबाबत दि.१८/०६/२०१९ रोजीच्या पत्रान्वये विनंती केली. गौण खनिज उत्खनन नियंत्रण प्रणालीनुसार लिलावधारकाने उत्खनन केलेल्या वाळूसाठ्यामधुन १४६ ब्रास वाळूची विक्री केली आहे.

४. उक्त वाळूस्थळावरून वाळू उत्खनन व वाहतुकीकरीता होत असलेल्या ग्रामपंचायतीचा विरोध व तहसिलदार, दक्षिण सोलापूर यांचा अहवाल पाहता, वाळू निर्गती सुधारीत धोरण, शासन निर्णय दि.०३/०१/२०१८ मधील परिच्छेद क्र.१९ (अ) नुसार वाळू उत्खननामुळे उद्भवलेल्या अडचणी व तक्रारी संदर्भात जिल्हास्तरीय समितीची बैठक आयोजित करण्यात आली. उक्त बैठकीत झालेल्या चर्चेअंती मौजे औज (म), ता. दक्षिण सोलापूर या वाळू स्थळावरून वाळू उत्खनन व वाहतुक बंद करणेबाबत सर्वानुमते निर्णय घेण्यात आला. लिलावधारकाने मा. न्यायालयाच्या स्थगिती आदेशामुळे व ग्रामस्थांच्या विरोधामुळे मंजूर ४१,४९३ ब्रासपैकी २,४३० ब्रास उत्खनन केले असून ३९,०६३ ब्रास उत्खनन करणे शिल्लक असल्याचे कळविले आहे. त्यानुसार लिलावधारकास रक्कम रू.११,३१,५२,५६७/- परत करण्याबाबचा शासनाने निर्णय घेतला आहे.

५. सबब, प्रतिक इन्फ्रास्ट्रक्चर प्रो .प्रा .नागेश लक्ष्मण ताकमोगे यांना एकूण रक्कम रु.११,३१,५२,५६७/- (रुपये अकरा कोटी एकतीस लक्ष बावन्न हजार पाचशे सदुसष्ट फक्त) इतकी शासनजमा केलेली रक्कम त्यांनी लिलावाची संपूर्ण रक्कम प्रत्यक्षात शासनाकडे जमा केल्याची, यापूर्वी ही रक्कम अदा केलेली नाही, याची खातरजमा करुन घेण्याच्या अटीवर अदा करण्यास या शासन ज्ञापनाद्वारे शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

६. याबाबीवर होणारा खर्च, सन २०१९-२० यावर्षाकरीता लेखाशिर्ष "०८५३ - अलोहयुक्त खाणी व धातुशास्त्रीय उद्योग "१०२ - खनिजबाबत सवलत फी व स्वामित्वधन, ९००, अलोहयुक्त खाणकाम व धातुशास्त्रीय उद्योग - वजा परतावे (००) (०१) वजा परतावे (०८५३ ००८६) खाली वजा परतावे देण्याकरीता करण्यात आलेल्या उपलब्ध अंदापत्रकीय तरतूदीमधून खर्ची टाकून भागविण्यात यावा.

७. सदर ज्ञापन वित्त विभागाच्या सहमतीने त्या विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक ३४३/२०१९/व्यय-९, दि.२३/०८/२०१९ अनुसार दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन शासन ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१९०९१८२०२३०२७७१९ असा आहे. हे शासन ज्ञापन डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

Dinesh Rohidas Chavan

Digitally signed by Dinesh Rohidas Chavan
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c0edee7a8805e86e41846cf28cf151b9ce48bb88ebf4f2e8a7fc10e8dcad98ec, serialNumber=8c2377ed235498603821d49922a210871ff6fb9b369722ac707aee7dcd87f2bd, cn=Dinesh Rohidas Chavan
Date: 2019.09.18 20:29:29 +05'30'

(दि.रो. चव्हाण)
अवर सचिव, महसूल व वन विभाग

प्रति,

जिल्हाधिकारी सोलापूर, सोलापूर.

प्रत:

१) विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे.

२) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, प्रतिष्ठा भवन, १०१, महर्षि कर्वे भवन, न्यू मरीन लाईन्स, मुंबई - ४०० ०२०.
३) प्रधान महालेखापाल (लेखापरीक्षा)-१, प्रतिष्ठा भवन, १०१, महर्षि कर्वे भवन, न्यू मरीन लाईन्स, मुंबई- ४०० ०२०.
४) जिल्हा कोषागार अधिकारी, सोलापूर.
५) वित्त विभाग, (व्यय-९/ अर्थसंकल्प -३/६/१४ कार्यासने) मंत्रालय, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई -४०० ३२.
६) कार्यासन अधिकारी (ब-१ कार्यासन) महसूल व वन विभाग, मंत्रालय, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई -४०० ३२.
७) निवडनस्ती “ख” कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई -४०० ३२.